सबब माझ्याखेरीज इतर कोणालाही त्यासंबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अथवा हितसंबंध प्राप्त झालेले नाहीत. तसेच या दोन्ही स्थावर मालमत्तेसंबंधी कोणालाही कुळाचे अथवा तत्सम हक्क किंवा अधिकार निर्माण झालेले नाहीत; आणि

ज्याअर्थी सदरहु दोन्ही शेतजमीनी ज्या खाली या दस्तात जोडलेल्या व याचा भाग असेलेल्या परिशीष्टाप्रमाणे पूर्ण मालकी व पूर्ण हिश्याने लिहून देणार/विक्रेता ला असलेल्या वहीवाट निस्ताराचे सर्व हक्क तसेच शेतीत असलेल्या झाडझुडुपे इत्यादी सहीत हे विक्रीपत्र नेहमीसाठी लिहून देणार/विक्रेता यांनी लिहून घेणार/खरेदीदार ला लिहून देत आहे; आणि

ज्याअर्थी, लिहून देणार/विक्रेता यांनी त्यांची उपरोक्त दोन्ही मिळकती लिहून घेणार/खरेदीदार यांना एकरकमी एकूण सौदा किंमत रूपये ५,०५,५०,०००/– (अक्षरी रूपये पाच करोड पाच लक्ष पन्नास हजार फक्त) मध्ये आपसी समझोत्याद्वारे विकण्याचे ठरविले असल्याने लिहून घेणार/खरेदिदार यांनी सदर्हू विक्री मोबदल्याचा भरणा मोबदल्याच्या तपशिलाप्रमाणे करण्याचे मान्य व कबुल केल्याने लिहून देणार/विक्रेता यांनी उपरोक्त दोन्ही स्थावर मालमत्ता लिहून घेणार/खरेदीदार यांना खालील अटी व शर्तीवर या विक्रिपत्राव्दारे नेहमीकरीता विकलेली आहे.

म्हणून विक्रीपत्राचा हा लेख खालील प्रमाणे अस्तित्वात येत आहे –

(१) लिहून देणार/विक्रेता हे लिहून घेणार/खरेदीदार यांना रूपये ५,०५,५०,०००/– (अक्षरी रूपये पाच करोड पाच लक्ष पन्नास हजार फक्त) च्या मोबदल्यात लिहुन देणार/विक्रेता हे मालक या नात्याने खास तुकडी – कोतेवाडा, तहसिल – हिंगणा, जिल्हा – नागपूर, पंचायत समिती हिंगणा, जिल्हा परिषद नागपूर तसेच सबरजिस्ट्रार हिंगणा यांच्या हद्दीतील **मौजा – कोतेवाडा**, तलाठी साझा क्र. ७२ येथील शेतजमीन जीचा **भूमापन/खसरा/गट क्रमांक १५३/१ व १६१/१**, दोन्ही भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग १, अनुक्रमे **आराजी ३.१६ हेक्टर आर व आराजी १.२५ हेक्टर आर**, अनुक्रमे जमा रू. ७ वार्षीक व रू. ४.८१ वार्षीक, खाते क्र. २० हिस्सापुर्ण शेतजमीनी तसेच त्यावरील सर्व प्रकारची झाडझुडपे, मय, तृण, काष्ट, पाषाण, तसेच इतर सर्व मालकी अधिकारांसह शेतजमीनी, ज्या गांव कोतेवाडा, तहसील – हिंगणा व जिल्हा – नागपूर येथे स्थित आहे. ज्याचा विस्तृत उल्लेख त्यानंतर असलेल्या परिशिष्टात केलेला आहे, सदर दोन्ही स्थावर संपत्ती संपूर्ण हक्क तथा अधिकारांसह लिहुन घेणार/खरेदीदार यांना हमेशाकरीता विकलेली आहे.

(२) सदर्हू सौदयाचा एकूण मोबदला रूपये ५,०५,५०,०००/– (अक्षरी रूपये पाच करोड पाच लक्ष पन्नास हजार फक्त) ही रक्कम लिहून देणार/विक्रेता यांना लिहून घेणार/खरेदीदार यांचे कडून खालीलप्रमाणे मिळालेले आहेत.

पुढील पानांवर .....

Scanned with CamScanner

मोबदल्याचा तपशील :–

रू. २०,००,०००/– (अक्षरी रूपये विस लक्ष फक्त) हि रक्कम लिहून घेणार/खरेदीदार यांनी लिहून देणार/विक्रेता यांना एचडीएफसी बँकेवरील धनादेश क्र. ००११९९ दिनांक ०७–११–२०१५ अन्वये बयानाप्रसंगी दिले, त्याची पोच या विक्रीपत्राद्वारे लिहून देणार/विक्रेता देत आहे.

रू. ९,००,०००/– (अक्षरी रूपये नऊ लक्ष फक्त) हि रक्कम लिहून घेणार/खरेदीदार यांनी लिहून देणार/विक्रेता यांना एचडीएफसी बँक या बँकेवरील धनादेश क्र. ००४१०० दिनांक ०७–११–२०१५ अन्वये दिले, त्याची पोच या विक्रीपत्राद्वारे लिहून देणार/विक्रेता देत आहे.

रू. २०,००,०००/– (अक्षरी रूपये विस लक्ष फक्त) हि रक्कम लिहून घेणार/खरेदीदार यांनी लिहून देणार/विक्रेता यांना एचडीएफसी बँक या बँकेवरील धनादेश क्र. ००१२०० दिनांक १०–११–२०१५ अन्वये दिले, त्याची पोच या विक्रीपत्राद्वारे लिहून देणार/विक्रेता देत आहे.

रू. ६०,००,०००/– (अक्षरी रूपये साठ लक्ष फक्त) हि रक्कम लिहून घेणार/खरेदीदार यांनी लिहून देणार/विक्रेता यांना एचडीएफसी बँक या बँकेवरील धनादेश क्र. ००१३१२ दिनांक १५–०१–२०१६ अन्वये दिले, त्याची पोच या विक्रीपत्राद्वारे लिहून देणार/विक्रेता देत आहे.

रू. १३,५०,०००/– (अक्षरी रूपये तेरा लक्ष पन्नास हजार फक्त) हि रक्कम लिहून घेणार/खरेदीदार यांनी लिहून देणार/विक्रेता यांना एचडीएफसी बँक या बँकेवरील धनादेश क्र. ००१३१३ दिनांक १५–०१–२०१६ अन्वये दिले, त्याची पोच या विक्रीपत्राद्वारे लिहून देणार/विक्रेता देत आहे.

रू. ३,३३,००,०००/– (अक्षरी रूपये तिन करोड तेहत्तीस लक्ष फक्त) हि रक्कम लिहून घेणार/खरेदीदार यांनी लिहून देणार/विक्रेता यांना एचडीएफसी बँक या बँकेवरील पे ऑर्डर क्र. 003869 दिनांक २०–०२–२०१९ अन्वये दिले, त्याची पोच या विक्रीपत्राद्वारे लिहून देणार/विक्रेता देत आहे.

पुढील पानांवर .....

हगन
२७८/२०१९
८३९

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 HAVELI

Scanned with CamScanner